# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक २८/१०/२०२३

| अ | पोस्टे अप क्र कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना ता.वेळ | दाखल ता. वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | तिवसा 411/23 कलम 279, 304 (अ) भा.द.वी | देविदास वसंतराव काळे रा .तळेगाव ठाकूर धंदा मजुरी | अज्ञात वाहन चालक | अमरावती नागपूर रोड लालासाहेब कॉलेज समोर तिवसा | 27/10/23 च 13/00 वा. | 27/10/23 चे 21.54 वा | हकीकत- अशा प्रकारे आहे की यातील नमूद घ. ता. वेळ ठिकाण फिर्यादी यानी पोस्टे ला येऊन जबानी रिपोर्ट दिला की तिचा भाऊ तळेगाव ते तिवसा रोडनी येत असतात अज्ञात वाहनाने धडक दिल्याने तिच्या डोक्याला मार लागला अवस्थेत पडून असता. काही लोकांनी त्याला तिवसा ग्रा.रु.येथे दाखल केले डॉक्टरांनी त्याचा प्रथम उपचार करून अमरावती येथे सवदेकर हॉस्पिटल इथे रेफर केले त्याची प्रकृती गंभीर झाल्यामुळे त्याला अमरावती वरून नागपूर येथे दाखल करण्यास सांगितले नागपूर नेत असतात वरखेड फाट्यावर तेचा श्वास घेणे बंद झाला व हालचाल शरीराची बंद झाल्यामुळे त्यांनी त्याला पुन्हा तिवसा ग्र. रु येथे दाखल केले डॉक्टरानी त्याला मृत घोषित केले सदर च्या रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 2 | अंजनगाव 648/23 कलम 354, 323, 504, भादवि | सौ वय 51 वर्ष | गजानन देविदास बोरेकर वय 49 वर्ष रा. अंजनगाव सुर्जी | | 24/10/2023 चे 10/30 वा ते दि. 25/102023 चे 12/00 वा दरम्यान | 27/10/2023 चे 20/51वा | हकीकत अशा प्रकारे आहे कि, फिर्यादी व आरोपी हे शेजारी राहत असुन नमुद घता वेळी व ठिकाणी दि 24/10/2023 रोजी दस-याच्या दिवशी रात्री अंदाजे 10/30 वा चे सुमारास मी घरात जेवण आटपून झोपली असता, माझ्या घराचे दार ठोठावण्याचा आवाज आला, मला वाटले कोणी दस-याचे सोने देण्यासाठी आले असेल म्हणून मी दरवाजा उघडला असता माझ्या घरासमोर राहणारा आरोपी हा दारू पिउन दरवाज्यासमोर उभा दिसला. मी त्याला काय काम आहे विचारले असता त्याने म्हटले की मी दस-यानिमीत्त सोने देण्यासाठी आलो. तो मला घराच्या आतमध्ये लोटण्याचा प्रयत्न करीत होता. लोटलाट करीत असतांना त्याने माझ्या गळयावर, खांदयावर ओरबाडले. आरोपी हा पुन्हा रात्री झालेल्या प्रकरणावरून माझ्याशी हुज्जतबाजी करु लागला, त्यावरून त्याने मला शिवीगाळ करून मारहाण केली व मला लोटून खाली पाडल्याने माझे खांदयाला व डोक्याला मूका मार लागला आहे. अशा फीर्यादी यांचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 3 | मोर्शी 530/23 कलम 354. 354(A).452. 323. 504. 506.34 भादवि | सौ वय 45 वर्ष मोर्शी | 1)रुपेश गजानन वजाडे राहणार खानापूर पातुर अकोला 2) प्रदीप तुलसीदास वजाळे राहणार खानापूर पातूर अकोला | राधे नगर मोर्शी 1किमी उत्तर | 27/10/2023 चे 12/00वा ते 12/45वा दरम्यान | 27/10/2023चे 21/44वा | हकीकत दि 27/10/2023 रोजी दुपारी 12:45 सुमारास मी व माझी मुलगी असे आम्ही घरी हजर असताना माझे जवाई रुपेश गजानन वजडे व त्यांचा चुलत भाऊ प्रदीप तुळशीदास वजाळे असे दोघे माझे घरात अनाधिकृत प्रवेश करून आत मध्ये आल्यावर तेव्हा माझ्या नातू वय दीड वर्ष हा पाडण्यात झोपलेला होता तेव्हा जवाई रुपेश वजाडे हे माझे नातवाला पाळण्यातून काढत होते म्हणून मी माझे मुलीला जवायला म्हटले की मुलगा झोपलेला आहे त्याला कशाला पाडण्यातून काढत असे म्हटले असता त्यांनी माझे मुलीला ओढताड करून लोट लाट केली व थापड्या बुक्क्यांनी मारहाण केली म्हणून मी त्यांना समजविण्यात गेली असता मला जवाई रुपेश वजारे यांनी शिवीगाळ करून लोटलाट केले त्यादरम्यान जवई यांचा चुलत भाऊ प्रदीप तुळशीदास वजाळे वय 35 वर्ष यांनी माझे एकदम तोंड दाबून माझ्या विनयभंग करण्याचे उद्देशाने माझे पाठीवर व पाठीचे खाली हात फिरवून माझा विनयभंग केला व म्हटले की तू आवाज केला तर तुला जीवाने मारून टाकेल अशी धमकी दिली वरून पोस्टेला येऊन सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | चिखलदरा 214/23 कलम 324, 504,34 भा द वि | सहदेव रामाजी मावसकर वय 22 वर्षे धंदा शेती रा. घाना ता. चिखलदरा | 1-बाजीलाल बालाजी सावरकर 2-सो तुलसा बाजीलाल सावरकर दोन्ही रा. घाना | ग्राम घाना किमी 70 उत्तर | 27/10/2023 चे 12/00 वा दरम्यान. | 27/10/0 23 चे 16/21 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमूद घ.ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असून फिर्यादीच्या आईसोबत आरोपी क्रमांक 2 हिने शेतात वानर येण्याच्या कारणावरून वाद केला असता याचा राग मनात धरून आरोपी क्रमांक 1 व 2 यांनी दारू पिऊन येऊन फिर्यादीच पकडून शिवीगाळ करून कु्हाड उलटी करून फिर्यादीच्या डोक्यात मारून फिर्यादीत जखमी केले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व MO सा.यांचे मेडिकल सर्टिफिकेट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 5 | धारणी 643/2023 कलम 317 भा द वी | डॉ धम्मदीप बाळू भगत वय 31 वर्ष धंदा नोकरी रा वडगाव बिजारा कारंजा लाड ह मु प्राथमिक आरोग्य केंद्र बैरागड धारणी | सौ आशा रमेश परते वय 27 वर्ष रा रंगुबेली धारणी | ग्राम बैरागड ते हरदा गावाकडे जाणारा रस्त्यावरील मेन चौक | 27/10/2023 चे 20/15 वा दरम्यान | 27/10/2023 चे 23/56 वा | हकिकत अशाप्रकारे आहे की नमूद घ ता वेळी व ठिकाणि यातील आरोपी हिने अतिशय हलगर्जीपणे व बेजबाबदार पणे स्वताच्या बाळाला बेवारस स्थितीत , नग्न अवस्थेत ठेवून बाळाला मारण्याच्या अवस्थेत सोडून कुठे तरी निघुन गेली अश्या फी चे जबानी री वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण

करीता